# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः02.05.2024** **वारःगुरुवार**

---

1. उमेदवाराचे चिन्ह हाताळणी आणि साठवण संबंधी नव्या सूचना लागू करण्याचे निवडणूक आयोगाचे निर्देश
2. एप्रिल महिन्यात सर्वाधिक 2 लाख 10 हजार कोटी रुपयांचं जीएसटी संकलन
3. HPZ टोकन ॲप संबंधात CBI चे देशभरात 30 ठिकाणी छापे आणि
4. युनायटेड किंग्डममध्ये बेकायदेशीर स्थलांतरितांना हद्दपार करण्यास परवानगी देणारा कायदा मंजूर

**<u>एसएलयु</u>**

भारतीय निवडणूक आयोगानं सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचं पालन करून निवडणूक उमेदवार चिन्ह हाताळणी आणि साठवण अर्थात SLU संबंधी नव्या सूचना लागू करण्याचे निर्देश जारी केले आहेत. आयोगानं SLU हाताळणी आणि साठवणुकीसाठी नवी संहिता लागू करण्यासाठी सर्व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना आवश्यक त्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे आदेश दिले आहेत. गेल्या आठवड्यात, सर्वोच्च न्यायालयानं निवडणूक आयोगाला निवडणूकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर 45 दिवसांसाठी सर्व SLU, सीलबंद करून सुरक्षित ठेवण्याचे निर्देश दिले होते. हे सील तोडल्याशिवाय SLU उघडता येणार नाहीत; तसंच उमेदवार किंवा त्याच्या प्रतिनिधीलाच SLU वर चिकटवलेल्या सीलवर स्वाक्षरी करण्याची परवानगी असेल.

**<u>प्रचारबंदी</u>**

निवडणूक आयोगानं तेलंगणचे माजी मुख्यमंत्री आणि बीआरएस प्रमुख, के चंद्रशेखर राव यांना काँग्रेस पक्षाविरोधात कथित अपमानास्पद आणि आक्षेपार्ह विधाने केल्याबद्दल काल रात्रीपासून 48 तासांसाठी प्रचार बंदी घातली आहे. या कालावधीत चंद्रशेखर राव यांना निवडणुकांच्या संदर्भात कोणत्याही सार्वजनिक सभा, मिरवणुका, कार्यक्रम न करण्याचे आणि माध्यमांमध्ये मुलाखती न देण्याचे निर्देश आयोगानं दिले आहेत. राजकीय पक्ष आणि नेत्यांनी मतदारांची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने तथ्य नसलेली खोटी विधाने, वक्तव्ये करू नयेत असं आयोगानं म्हटलं आहे.

**<u>जीएसटी</u>**

जीएसटी म्हणजे वस्तू आणि सेवा कराचं यंदाच्या एप्रिल महिन्यातील स्थूल महसूल संकलन 2 लाख 10 हजार कोटी रुपये झालं असून आतापर्यंतचं ते सर्वाधिक जीसटी संकलन आहे. देशांतर्गत व्यवहार आणि आयातीतील मजबूत वाढीमुळे वर्षभरात त्यामध्ये 12 पूर्णांक 4 टक्के वाढ झाल्याचं केंद्रीय अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे. या वर्षी एप्रिलमधील एकूण जीएसटी संकलनापैकी केंद्रीय वस्तू आणि सेवा कर 43 हजार कोटी रुपये, राज्य वस्तू आणि सेवा कर 53 हजार कोटी, एकात्मिक वस्तू आणि सेवा कर 99 हजार कोटी तर उपकर 13 हजार कोटी

रुपये इतका आहे. जीएसटी परताव्यानंतर एप्रिल 2024 साठी गोळा झालेला निव्वळ GST 1 लाख 92 हजार कोटी रुपये असून  तो गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत साडे पंधरा टक्के जास्त असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**भत्ता**

केंद्र सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी अपत्यांच्या शिक्षण भत्ता आणि वसतिगृहाच्या अनुदानात, वाढ केली आहे. कर्मचाऱ्यांनी केलेला वास्तविक खर्च ग्राह्य न धरता मुलांच्या शिक्षण भत्त्याची प्रतिपूर्ती 2 हजार 812 रुपये प्रति महिना आणि वसतिगृह अनुदान प्रतिपूर्ती 8 हजार 437 रुपये प्रति महिना, निश्चित करण्यात आली आहे. दिव्यांग मुलांसाठी मुलांच्या शिक्षण भत्त्याची प्रतिपूर्ती, सामान्य दराच्या दुप्पट म्हणजे 5 हजार 625 रुपये इतकी राहणार आहे.

**एअर मार्शल**

एअर मार्शल नागेश कपूर यांनी काल वायुसेनेच्या प्रशिक्षण विभागाचे प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. 6 डिसेंबर 1986 रोजी भारतीय हवाई दलाच्या लढाऊ विभागात त्यांची नियुक्ती झाली होती. एअर मार्शल कपूर यांना उत्कृष्ट सेवेबद्दल, 2008 मध्ये वायु सेना पदक आणि 2022 मध्ये अति विशिष्ट सेवा पदक देऊन सन्मानित करण्यात आलं आहे.

**महासंचालक**

भारतीय माहिती सेवेच्या वरिष्ठ अधिकारी मौसमी चक्रवर्ती, यांनी काल आकाशवाणी वृत्त विभागाच्या महासंचालकपदाचा कार्यभार स्वीकारला. 1991 च्या तुकडीच्या IIS अधिकारी, चक्रवर्ती यांना पत्र सूचना कार्यालय आणि केंद्रीय संचार ब्युरोसह माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अनेक माध्यम संस्थांमध्ये काम करण्याचा मोठा अनुभव आहे.

**धाडी**

HPZ टोकन ॲपशी संबंधित फसव्या गुंतवणूक योजनेच्या तपासात केंद्रीय अन्वेषण विभाग CBI ने काल 10 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये विविध 30 ठिकाणी छापे टाकले. यात दोन खाजगी कंपन्या आणि त्यांच्या संचालकांचा समावेश आहे. अस्तित्वात नसलेल्या क्रिप्टोकरन्सी योजनेत गुंतवणूक करण्यासाठी जनतेची दिशाभूल करण्याबाबत ही कारवाई करण्यात आली. गुंतवणूकदारांकडून निधी गोळा करण्यासाठी सुमारे 150 बँक खाती वापरली गेली होती, आणि त्यातला निधी क्रिप्टोकरन्सी किंवा हवाला व्यवहारांद्वारे नंतर अनेकदा देशाबाहेर हस्तांतरित केला गेला असं प्राथमिक निष्कर्षांवरून निष्पन्न झालं आहे. जप्त केलेल्या पुराव्यांमध्ये मोबाईल फोन, कॉम्प्युटर हार्ड ड्राईव्ह, सिम कार्ड, एटीएम आणि डेबिट कार्ड, ईमेल खाती आणि कागदपत्रांचा समावेश आहे.

**महाराष्ट्र दिन**

महाराष्ट्र राज्याच्या पासष्ठाव्या स्थापनादिनाचा मुख्य शासकीय सोहळा काल मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर झाला. यावेळी राज्यपालांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. 'उद्यमशील, पुरोगामी, व्यावहारिक आणि कठोर परिश्रम करणारे नागरिक ही महाराष्ट्राची मोठी शक्ती असून, आपण सर्वांनी एकत्र येऊन समृद्ध आणि

बलशाली महाराष्ट्र घडवू या', असं आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी यावेळी केलं. लोकशाहीच्या उत्सवात सर्व मतदारांनी सहभागी होऊन मतदानाचा हक्क बजावावा, असं आवाहन राज्यपालांनी यावेळी केलं.

**प्रदर्शन**

इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्र IGNCA ने काल आंतरराष्ट्रीय कामगार दिन साजरा करण्यासाठी 'People and Places of India - A Retrospect' या शीर्षकाखाली एक प्रदर्शन आयोजित केलं होतं. या प्रदर्शनात प्रसिद्ध जर्मन कलाकार कार्ल एरिच मुलर यांचे IGNCA च्या संग्रहालयातील शिलालेख दाखवण्यात आले. यावेळी बोलताना IGNCA चे सदस्य सचिव डॉ. सच्चिदानंद जोशी यांनी शिलालेखांचं वेगळेपण, दुर्मिळता आणि अतिवास्तव सार व्यक्त केलं आणि ते सामान्य जीवनाचं सार कसं अंतर्भूत करतात यावर भर दिला. कार्ल एरिक मुलर यांचे शिलालेख त्यांच्या काळातील समाजाचा आरसा म्हणून काम करतात असं प्रतिष्ठित शिलालेख आणि मुद्रण कलाकार, दत्तात्रय आपटे यावेळी म्हणाले

**यूके- रवांडा निर्वासन**

रवांडाच्या स्थलांतरितांना पुढील दोन ते तीन महिन्यात परत पाठविण्याच्या उद्देशानं युनायटेड किंगडममधील अधिकाऱ्यांनी त्यांना ताब्यात घेण्यास कालपासून सुरुवात केली आहे. ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी जाहीर केलेल्या मुख्य स्थलांतर धोरणाचा पाया या कारवाईतून घातला जाणार आहे. या महिन्याच्या सुरुवातीला, ब्रिटीश संसदेनं बेकायदेशीररित्या रवांडातून आश्रयाच्या शोधात आलेल्यांना हद्दपार करण्यास परवानगी देणारा कायदा संमत केला होता. या वर्षी जुलैमध्ये स्थलांतरितांना घेऊन जाणारं पहिलं विमान सोडण्याचं उद्दिष्ट अधिकाऱ्यांनी ठेवलं आहे. तथापि, या धोरणाला विरोध करणाऱ्या मानवाधिकार संघटना आणि संस्था नवीन कायदेशीर आव्हानं देण्याची तयारी करत आहेत. गेल्या वर्षी युके च्या सर्वोच्च न्यायालयानं हे धोरण बेकायदेशीर घोषित केलं होतं. या वर्षी आतापर्यंत 7,500 हून अधिक स्थलांतरित फ्रान्समधून लहान बोटींमधून इंग्लंडमध्ये पोहोचले आहेत. सरकारच्या म्हणण्यानुसार, या नियमामुळे लोकांना खाडी ओलांडून धोकादायक प्रवास करण्यापासून परावृत्त केले जाईल, असे करताना गेल्या आठवड्यात पाच जणांचा मृत्यू झाला होता.

**आशियाई युवा मुष्टियुद्ध**

आशियाई 22 वर्षांखालील आणि युवा मुष्टियुद्ध स्पर्धांमध्ये भारतीय मुष्टियोद्धे आर्यन, यशवर्धन सिंग, प्रियांशु आणि साहिल काल उपांत्य फेरीत पोहोचले आहे. कझाकस्तानमध्ये अस्ताना इथं सुरु असलेल्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धांमध्ये 24 हून अधिक देशांचे 390 हून अधिक मुष्टियोद्धे सहभागी झाले आहेत. विविध 25 वजनी गटांमध्ये ते पदकांसाठी लढणार आहेत.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.